**<u>फौजदारी अपील क्र. ४०/२०२३</u>**
<u>CNR No. MHWR010012102023</u>
महेंद्र व एक -वि.- शासन
**आदेश नि.क्र.४ वर**

अर्जदारांचे विधीज्ञ श्री पी.एस.ताकसांडे यांचा युक्तीवाद ऐकला. संक्षिप्त फौ. ख.क्र. ५८५/२०१७ मध्ये दिनांक ०६.०७.२०२३ रोजी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आर्वी यांनी सदरील आरोपी/अपिलार्थी क्र. १ व २ यांना दारुबंदी अधिनियमाचे ६५ अ, ७७ अ व भारतीय दंडविधानाचे कलम १७० च्या गुन्हयाकरिता अनुक्रमे ३ वर्ष व २ वर्ष सक्त मजुरीची कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

२. न्यायदंडाधिकारी यांनी सदरील शिक्षेच्या अमंलबजावणी करिता आरोपींना अपील दाखल करे पर्यंत एक महिन्याचे कालावधीकरिता स्थगिती दिलेली होती. आज रोजी दोन्ही अपीलार्थी हजर आहेत. सदरील न्यायनिर्णयाविरुद्ध अपिलार्थींनी दाखल केलेल्या अपिलाचे सुनावणीकरिता बराच कालावधी लागेल. त्यामुळे माझे मते फौ.प्र.सं.चे कलम ३८९ प्रमाणे अपिलाचा निकाल लागेपर्यंत आरोपींना झालेल्या शिक्षेच्या अमंलबजावणीस स्थगिती देणे योग्य होईल. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) संक्षिप्त फौ. ख.क्र. ५८५/२०१७ मध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आर्वी यांनी आरोपी/अपीलार्थी क्रं.१ व २ यांना भा.दं.वि.चे कलम १७० व दारुबंदी अधिनियमाचे ६५ अ, ७७ अ चे अपराधाकरिता सुनावलेल्या करावासाच्या शिक्षेच्या अमंलबजावणीस सदरील अपिलाचा निकाल लागेपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

(२) अपिलार्थी/आरोपींना वैयक्तीक जातमुचलका रक्कम २५,०००/-

प्रत्येकी व तितक्याच रकमेच्या एका जामिनदाराचे जामीनबंध पत्रावर जामिनावर सोडण्यात येत आहे.

(३) सदरील आदेश खालील न्यायालयास कळवावा.

दि.०२.०८.२०२३ (एन.बी. शिंदे)
वर्धा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वर्धा.